15-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 14-06-2025 22:28 Page 1



## निवडक

### पार्से येथे आज भाजपची मंडल संकल्प सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १४** : केंद्रात भारतीय जनता पक्षाने सेवा, सुशासन व गरीब कल्याणची ११ वर्षे पूर्ण केल्याबद्दल,मांद्रे मतदारसंघांची 'मंडल संकल्प सभेचे रविवार दि. १५ रोजी संध्या ६ वाजता पार्से पंचायत सभागृहात आयोजन केल्याची माहिती गोवा प्रदेश भाजपचे सचिव व पक्षाचे प्रवक्ते तथा मांद्रेचे माजी आमदार दयानंद सोपटे यांनी दिली.

विकसित भारत का अमृत काल,ह्या संकल्पनेतून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अकरा वर्षात देशाची प्रतिमा उंचावली व जागतिक महासत्ता होण्यासाठी प्रयत्न सुरू केले.त्या कार्याची माहिती तळागाळात पोचवण्यासाठी भाजपच्या शिस्तबद्ध कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे,असा संकल्प आहे.

ह्या सभेस मांद्रे प्रभारी गोविंद पर्वतकर तसेच अन्य नेते उपस्थित राहणार आहेत.तरी ह्या सभेत मांद्रे मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन माजी आमदार दयानंद सोपटे यांनी केले आहे.

---

### पतंजलीतर्फे योग दिवसासाठी निःशुल्क योग प्रशिक्षक उपलब्ध

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १४** : २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. प्रशासकीय आदेशानुसार यावर्षी योग दिन शाळा, महाव्यिालये सरकारी तसेच निमसरकारी व खाजगी कार्यालये विविध संस्था व संघटना मध्ये साजरा करण्यात येणार आहे. त्यांना निःशुल्क सहकार्य करण्यासाठी पतंजलि योग पिठाचे प्रशिक्षित योग शिक्षक तयार आहेत. बार्देश तालुक्यातील कुठल्याही शाळेला, महाविद्यालयाला, सरकारी निमसरकारी, खाजगी कार्यालये संस्थाना जर योग शिक्षकाची गरज असेल तर त्यांनी खालील नंबर वर संपर्क साधावा, असे आवाहन पतंजली संघटनेचे बार्देश अध्यक्ष अशोक साळगावकर यांनी केले आहे. अशोक साळगावकर (९८२२४८४८४१), सिद्धेश राऊत (९८९०२५१३५१).

---

### मोपा उपसरपंचावर अविश्वास ठराव

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १४** : पेडणे तालुक्यातील सुबोध महाले यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या तांबोसे – उगवे – मोप ग्राम पंचायतीच्या उपसरपंचा अश्विनी महाले यांच्यावर ७ पैकी ४ पंचायत सदस्यांनी सोमवार दि. ९ रोजी अविश्वास ठराव दाखल करण्यात आला असून यावर चर्चा करण्यासाठी बुधवार दि. १८ रोजी पंचायत मंडळाची बैठक बोलविण्यात आली आहे.

पेडणेचे लोकप्रिय आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पेडणे मतदारसंघातील तांबोसे उगवे मोप ग्राम पंचायतीच्या ७ सदस्यांपैकी सरपंच सुबोध महाले, पंच सदस्या सिया धुरी, पंच सदस्य विजय मोपकर व काशिनाथ पेडणेकर या ४ पंचायत सदस्यांकडून हा अविश्वास ठराव दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पंचायत कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान उपसरपंचा अश्विनी महाले, पंच सदस्या सुलक्षा महाले आणि पंच सदस्य दयानंद गवंडी यांच्या या अविश्वास ठरावावर सह्या नाहीत. अशी माहिती प्राप्त झाली आहे. यावर चर्चा करण्यासाठी बुधवारी दि. १८ रोजी पंचायत मंडळाची बैठक बोलविण्यात आली आहे, अशी माहिती तांबोसे उगवे मोप ग्राम पंचायत कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

---

### फर्मागुडी येथे २१, २२ रोजी 'श्रवणानंद' कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १४** : चतुरंग प्रतिष्ठान या सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात गेली ५१ वर्षे महत्त्वाचे कार्य करणाऱ्या संस्थेच्या गोवा शाखेतर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या 'श्रवणानंद' या दोन दिवसीय कार्यक्रमात अविनाश धर्माधिकारी यांची दोन व्याख्याने आयोजित करण्यात आली आहे. सदर व्याख्याने दि. २१ व २२ रोजी फर्मागुडी – फोंडा येथील गोवा विद्याप्रसारक मंडळाच्या श्रीमती नेली आगियार उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात संध्याकाळी ६ ते ७ .३० यावेळेत होणार आहेत.

२१ रोजी 'ऑपरेशन सिंदुर' तर २२ रोजी 'स्पर्धा परीक्षा आणि गोवा सहभाग ' या विषयांवर श्री. धर्माधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आले आहे.

---

### मडगावमध्ये रस्त्याच्या कडेला अतिक्रमणाचा वाढता त्रास

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४:** रस्त्याच्या कडेला विक्रेत्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण अतिक्रमणामुळे सार्वजनिक जागा संकुचित होत असून,मडगाव मध्ये येणाऱ्या सामान्य प्रवाशांचे आणि पादचाऱ्यांचे दैनंदिन हाल सुरूच आहेत. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ही समस्या दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करत आहे. केपे मार्गावरील मुख्य बस थांब्याजवळ नारळ, फळे व इतर वस्तू विकणाऱ्या हातगाडीवाल्यांनी रस्त्याच्या कडेला स्टॉल उभारून वाहतुकीला अडथळा निर्माण केला आहे. परिणामी पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालण्याशिवाय पर्याय राहत नाही, ज्यामुळे त्यांचा जीव धोक्यात येता ही समस्या अनेक महिन्यांपासून आहे. रोजचा प्रवास आमच्यासाठी एक त्रासदायक अनुभव झाला आहे. अधिकारी केवळ पाहत आहेत, पण कारवाई होत नाही, असे स्थानिक दुकानमालक रमेश शिरोडकर यांनी संतप्तपणे सांगितले.स्थानिक रहिवासी शिवानंद बोरकर यांनी स्पष्टपणे सांगितले की , सार्वजनिक जागा ही खाजगी व्यवसायासाठी नाही. एमएमसी आणि स्थानिक संस्थांनी नियमांची अंमलबजावणी करावी आणि या विक्रेत्यांना योग्य व्हेंडिंग झोनमध्ये हलवावे.

ही अडचण केवळ बस थांब्यापुरतीच मर्यादित नाही. मडगाव नगरपरिषदेच्या (एमएमसी) मुख्य मार्केट परिसरात आणि त्याच्या आजूबाजूच्या रस्त्यांवरही विक्रेत्यांनी अतिक्रमण केले आहे. यामुळे या परिसरात नेहमीच गर्दीचे आणि वाहतूक कोंडीचे वातावरण निर्माण होते. वाहनचालक आणि पादचाऱ्यांना अडथळ्यांमुळे तणावाचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्याच्या तोंडावर या अतिक्रमणामुळे परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पावसात फूटपाथ वापरणे अशक्य होईल आणि नागरिकांना थेट रस्त्यावरून जावे लागेल, जे अधिक धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी मडगाव नगरपालिका, वाहतूक खाते आणि जिल्हा प्रशासनाला आवाहन केले आहे की त्यांनी तातडीने कारवाई करून अतिक्रमण हटवावे. तसेच पथविक्रेत्यांसाठी स्वतंत्र व नियोजित व्हेंडिंग झोन स्थापन करून त्यांच्या उपजीविकेचेही रक्षण करावे, अशी मागणी होत आहे

---

### वडेश्वर वारकरी मंडळातर्फे पंढरपूर बस वारीचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १४** : श्री वडेश्वर वारकरी मंडळ – बोर्डे डिचोली तर्फे आषाढी एकादशी निमित्त आठवी पंढरपूर बस वारीचे शनिवार दि २८ रोजी आयोजन केले आहे. या पंढरपूर बस वारीत ७० ते ८० वारकऱ्यांना प्रवेश दिला जाईल . प्रवेश फी फक्त रु. २००० असेल .

प्रामुख्याने शनिवार दि. २८ रोजी सकाळी ८.३० वाजता वडाकडे बोर्डे डिचोली येथे वारकरी मंडळीने हजर राहावे. बस ९ वाजता वारीसाठी निघेल. दुपारी १ ते २ पर्यंत दुपारच्या जेवणाचा कार्यक्रम श्री रवळनाथ देवस्थान – ओटावणे बांदा येथे होईल. रात्रीच्या जेवणासाठी रु. १०० चे कुपन दिले जाईल. रविवार दि. २९ रोजी सकाळी ६ वाजता गाडी पंढरपूर येथे पोहोचेल. सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत देवदर्शन होईल. दुपारचे जेवण स्वखर्चाने करावे. संध्याकाळी ४ वाजता गाडी पंढरपूरहुन गोव्यासाठी यायला निघेल. रात्रीच्या जेवणासाठी रु. १०० चे कुपन दिले जाईल. संपूर्ण कार्यक्रमा बाबतीत व नाव नोंदणीसाठी अध्यक्ष – विठ्ठल (दादी) करमळकर (९८२३६२६०२८/९३२२३९०३४७) व सचिव – इंद्रजीत नार्वेकर (८००७४२२०१० ) यांच्याशी संपर्क साधावा.

---

# दुर्गंधी आणि अस्वच्छतेने भरले मडगाव मासळी मार्केट

- मासे विक्रेत्यांचा तीव्र निषेध
- तत्काळ स्वच्छतेची विक्रेत्यांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. १४** : मडगाव येथील घाऊक मासळी बाजारातील वाढती अस्वच्छता आणि दुर्गंधी याविरोधात मासे विक्रेत्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत नगरपालिकेकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे. या बाजारपेठेतील घाणेरड्या परिस्थितीकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत विक्रेत्यांनी आरोग्याच्या दृष्टीने संभाव्य धोक्यांचा इशारा दिला आहे.

दररोज शेकडो ग्राहकांची ये–जा असलेल्या या मार्केट मध्ये साचलेल्या घाणीत मासेमारीचे पाणी, कचरा आणि दुर्गंधीमुळे वातावरण असह्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर विक्रेते आणि ग्राहक दोघेही त्रस्त झाले असून, व्यापारावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

स्थानिक व्यापारी फ्रान्सिस फर्नांडिस यांनी सांगितले की, प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत काहीच सुधारणा झालेली नाही. रोज मार्केट स्वच्छ होईल. या आशेने येतो, पण या दुर्गंधीत उभे राहणेही कठीण झाले आहे. नियोजनशून्य ड्रेनेज व्यवस्था आणि नियमित स्वच्छतेच्या अभावामुळे हे मार्केट सतत ओल्या आणि निसरड्या स्थितीत असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. यामुळे ग्राहकही त्रस्त झाले असून, अनेक जण आता खासगी विक्रेत्यांकडे वळत आहेत.या घाणीत कोण मासे घ्यायला येईल? ग्राहक येतात, पण दृष्य पाहून परत जातात. काहींनी तर पूर्णपणे येणंही बंद केलं आहे. याचा थेट फटका आमच्या उत्पन्नावर बसतो आहे, असे ज्येष्ठ विक्रेते रोजारियो डिसोझा यांनी सांगितले.

पावसाळा तोंडावर असताना, या अस्वच्छतेमुळे पाणी साचून डास, दुर्गंधी आणि विविध संसर्गजन्य रोगांचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर विक्रेत्यांनी महापालिकेने बाजारात तातडीने नियमित स्वच्छता मोहीम राबवावी, सांडपाणी व्यवस्थापन दुरुस्त करावे आणि योग्य कचरा विल्हेवाट यंत्रणा उभारावी अशी मागणी केली आहे.

या ठिकाणी मूलभूत स्वच्छता व्यवस्थाही नाही. हे शहरातील एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र असूनही, प्रशासनाचा कोणताही ठोस हस्तक्षेप झालेला नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया विक्रेत्यांकडून व्यक्त करण्यात आली. दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरण (एसजीपीडीए) तसेच मडगाव महापालिकेने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देत त्वरीत उपाययोजना करावी, अन्यथा उद्भवणाऱ्या सार्वजनिक आरोग्य समस्येस प्रशासन जबाबदार असेल, असा स्पष्ट इशाराही विक्रेत्यांनी दिला आहे.

---

## व्हायरल व्हिडिओनंतर एसजीपीडीएकडून फिश मार्केटची पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४** : सार्वजनिक अस्वच्छतेबाबतच्या तक्रारी आणि मडगावमधील एसजीपीडीए घाऊक मासळी बाजारात मासे अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत विकले जात असल्याचे दाखवणाऱ्या व्हायरल व्हिडिओनंतर, एसजीपीडीएचे अध्यक्ष आमदार दाजी साळकर यांनी मार्केटची पाहणी करून स्थितीचा आढावा घेतला.

साळकर यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले की, मडगावातील नवीन घाऊक मासळी बाजार लवकरात लवकर कार्यान्वित केला जाईल. यासंदर्भातील अंतिम निर्णय १७ जून रोजी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीत घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

नवीन मासळी मार्केटसाठी निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून, ती आगामी एसजीपीडीएच्या बैठकीत अंतिम केली जाईल, अशी घोषणा साळकर यांनी केली. त्यांनी स्पष्ट केले की नव्या बाजारात सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा उभारली जाणार असून, त्यामुळे साळ नदी वा परिसरातील शेतजमिनी प्रदूषित होणार नाहीत. तात्काळ उपाययोजनेच्या अनुषंगाने, मार्केटमधील साचलेले पाणी काढून जागा सपाट केली जाईल आणि बंद पडलेले नाले उघडले जातील, असेही त्यांनी सांगितले.

या मासळी मार्केटमध्ये बेकायदेशीररित्या किरकोळ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवरही साळकर यांनी नाराजी व्यक्त केली. घाऊक संकुलात किरकोळ विक्री करणाऱ्या गैर–गोमंतकीय व्यक्तींवर कारवाई केली जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

त्यांच्या कार्यालयात मासळी बाजाराशी संबंधित प्रकल्पाच्या फाइल्स रखडल्याचा आरोप फेटाळून लावत, साळकर यांनी एसजीपीडीए प्राधिकरण प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला.

साळकर यांनी यावेळी माहिती दिली की, एसजीपीडीएच्या मालकीच्या किरकोळ मासळी बाजाराचे संपूर्ण नूतनीकरण करण्यात येणार आहे. बाजारातील नाल्यांची सफाई झाली आहे, मात्र विक्रेते आणि व्यापाऱ्यांनीही परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. स्वच्छता आणि शौचालय व्यवस्थापनासाठी खासगी यंत्रणांच्या माध्यमातून सेवा आउटसोर्स केली जाणार असून, नियमित देखभालीसाठी हे उपाय आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एसजीपीडीए मार्केटबाहेर वसूल केल्या जाणाऱ्या शुल्कासंदर्भात स्पष्टीकरण देताना साळकर यांनी सांगितले की, सोपो वसुलीचा अधिकार हा मडगाव पालिकेच्या अखत्यारीत असून, एसजीपीडीए यामध्ये हस्तक्षेप करणार नाही.बाजारात बदलांच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक मच्छीमारांवर परिणाम होऊ नये, यासाठी संक्रमण काळात त्यांना मासे विक्रीसाठी वेळ सवलत देण्यात येईल, अशी माहिती साळकर यांनी दिली.

---



## मुसळधार पावसामुळे रस्त्यावर मातीची धूप

■ टीम दैनिक हेराल्ड

- भूमिगत केबल्स उघड्या, प्रवाशांना धोका

**फोंडा, दि. १४** : खांडेपार येथील ओपा जलशुद्धीकरण केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात मातीची धूप झाली असून, या भागातील रस्ता चिखलमय आणि निसरडा झाला आहे. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी तसेच कामगारांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे.

या पावसामुळे फक्त रस्ता चिखलमय झाला नाही, तर भूमिगत वीज केबल्सदेखील उघड्या पडल्या आहेत. त्यामुळे विद्युतधोका निर्माण होण्याची शक्यता असून तातडीने उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिक संदीप पारकर यांनी सांगितले की, दरवर्षी पावसाळ्यात अशी परिस्थिती उद्भवते. मुसळधार पावसानंतर माती रस्त्यावर वाहून येते आणि चिखल साचतो. रात्रीच्या वेळी जलशुद्धीकरण केंद्रात काम करून घरी परतणाऱ्या सुमारे ६० कर्मचाऱ्यांसाठी हा रस्ता अत्यंत धोकादायक ठरतो. पारकर यांनी स्पष्ट केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने काही ठिकाणी चेतावणी फलक आणि बॅरिकेड्स लावले असले, तरीही दीर्घकालीन उपाययोजना न केल्याने ही समस्या दरवर्षी पुन्हा समोर येते.

पावसाचे पाणी वाहून जाण्याची योग्य व्यवस्था नसल्यामुळेच ही समस्या उद्भवते, असे पारकर यांनी सांगितले. रस्त्याच्या कडेला योग्य प्रकारचे ड्रेनेज आणि गटार व्यवस्था करून ही समस्या कायमची सोडवावी लागेल.

सध्या केबल्स उघड्या असल्यामुळे संभाव्य अपघात आणि विद्युतधोका टाळण्यासाठी तातडीने रस्त्याचे पुनरुज्जीवन करण्याची गरज निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिक आणि कामगारांनी प्रशासनाकडे या समस्येवर त्वरित आणि शाश्वत उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

---

## मडगाव अग्निशमन दलाच्या बॅरेकची स्थिती दयनीय

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४** : जीव वाचवण्यासाठी दिवसरात्र तत्पर असलेल्या मडगाव अग्निशमन दलाच्या जवानांना अत्यंत दयनीय आणि असुरक्षित निवासव्यवस्थेला सामोरे जावे लागत आहे. या बॅरेकची अवस्था इतकी बिकट आहे की ती अमानवीय आणि दुर्लक्षित असल्याचे जवानांचे म्हणणे आहे. ही परिस्थिती पाहता आपत्कालीन सेवा कर्मचाऱ्यांच्या कल्याणाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्थानिक पातळीवर उभारण्यात आलेल्या आणि जवानांसाठी असलेल्या या बॅरेकमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता, स्वच्छतेचा अभाव, दूषित पाणी, अपुरी वायुवीजन व्यवस्था आणि कीटक नियंत्रणाचा अभाव असे गंभीर प्रश्न आहेत. छत गळते, खोल्या अतिप्रचंड गर्दीने भरलेल्या, स्वच्छतागृहांची दुर्दशा आणि विद्युत प्रणालीतील दोष ही चित्रे या ठिकाणच्या हलाखीची स्पष्ट साक्ष देतात. ही स्थिती कोणत्याही माणसासाठी योग्य नाही; आम्ही जेव्हा ड्युटीवर नसतो, तेव्हा इथे विश्रांतीऐवजी त्रासच मिळतो, असे एका अग्निशमन कर्मचाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

वरच्या मजल्यावरील परिस्थिती आणखी वाईट असून तिथून गळणारे मूत्र मिश्रित पाणी थेट खालच्या खोल्यांमध्ये शिरते. अनेक जवानांना ओले कपडे व बेडमुळे झोपेसाठी कोरड्या जागेचा शोध घ्यावा लागतो.

बॅरेकची विद्युत व्यवस्था धोकादायक स्थितीत आहे. सतत होणाऱ्या शॉर्ट सर्किटमुळे आगीचा संभाव्य धोका निर्माण झाला असून, ही परिस्थिती अग्निशमन दलासारख्या विभागासाठी अत्यंत विडंबनात्मक ठरते.

स्थानिक रहिवासी आणि सार्वजनिक सुरक्षा समर्थकांनी या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. जर आपत्कालीन सेवा देणाऱ्यांचीच काळजी घेतली जात नसेल, तर संकटाच्या वेळी आम्ही त्यांच्या सेवांवर कशी विश्वास ठेवू? असा सवाल मडगावमधील रहिवासी रोहन नाईक यांनी उपस्थित केला.

सध्या अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालय तसेच संबंधित स्थानिक यंत्रणांकडून तातडीने सुधारात्मक उपाययोजना राबविण्याची गरज अधोरेखित होत आहे. जवानांना सुरक्षित, स्वच्छ आणि सन्मानजनक निवासव्यवस्था मिळावी, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

---

## पारंपरिक मच्छीमारांच्या बोटींसाठी हॅचरीची जागा मिळणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४** : पावसाळ्यात पारंपरिक मच्छीमारांच्या मासेमारी बोटींना सुरक्षित डॉकची अडचण लक्षात घेता, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बाणावली येथील सध्या वापरात नसलेल्या हॅचरीच्या जागेचा आढावा घेण्याचे निर्देश दक्षिण गोव्याचे जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. या जागेचा उपयोग मच्छीमारांच्या बोटींना डॉक करण्यासाठी होऊ शकेल का, याची पाहणी करून जमीन उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

'खारवी भावांचो एकवोट' या बॅनरखाली एकत्र आलेल्या मच्छीमार प्रतिनिधी मंडळाने नुकतीच मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन हॅचरी परिसरातील वापरात नसलेली ५ हजार चौरस मीटर जमीन पावसाळ्यात त्यांच्या बोटी ठेवण्यासाठी देण्याची औपचारिक मागणी केली होती. प्रतिनिधींनी मुख्यमंत्री सावंत यांच्याकडे सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वाढती समुद्रपातळी आणि खाजगी मालमत्ता धारकांचा विरोध यामुळे पारंपरिक मच्छीमारांना त्यांच्या बोटींना सुरक्षितपणे किनाऱ्यावर लावणे अधिकाधिक कठीण झाले आहे.

संघटनेचे अध्यक्ष जोस फर्नांडिस यांनी मुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. या वर्षी पावसाळ्यात बोटींना पार्क करण्यासाठी आम्ही अक्षरशः जागेअभावी हैराण झालो आहोत. बाणावली हॅचरीजवळची जमीन हेच आमच्यासाठी एकमेव व्यवहार्य पर्याय आहे, असे फर्नांडिस यांनी सांगितले. मच्छीमार पेले फर्नांडिस यांनी माहिती दिली की मत्स्यव्यवसाय विभागाने त्यांना यापूर्वी बोटी किनाऱ्यावरून हटवण्याचे आदेश दिले होते, आणि त्यांनी केलेल्या विनंतीलाही विभागाने नकार दिला होता. मुख्यमंत्री सावंत यांना याचा माहिती नव्हती. त्यांनी तत्काळ लक्ष घालण्याचे आश्वासन दिले, असे फर्नांडिस यांनी स्पष्ट केले.

शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले की, बाणावली समुद्रकिनाऱ्याजवळील सुमारे ५५ हजार चौरस मीटर जमीन तीन दशकांपूर्वी मत्स्यव्यवसाय विभागाने कोळंबी उबवणुकीसाठी संपादित केली होती. आज त्या जमिनीचा उपयोग केला जात नाही. त्यामुळे त्यापैकी केवळ ५ हजार चौरस मीटर जागा मच्छीमार समुदायासाठी बर्थिंगसाठी वाटप करावी, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर आता ही बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या निरीक्षणाखाली आहे. स्थानिक मच्छीमार समुदायाला पावसाळ्यात दिलासा मिळावा आणि त्यांच्या उपजीविकेस चालना मिळावी, यासाठी सकारात्मक निर्णय येईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## साखळी चोरांचा सासष्टीत सुळसुळाट

■ टीम दैनिक हेराल्ड



**सासष्टी, दि. १४** : सासष्टी मधील दवर्ली परिसरात दिवसाढवळ्या घडलेल्या चेन स्नॅचिंगच्या घटनेने पुन्हा एकदा स्थानिक रहिवाशांमध्ये, विशेषतः महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. या प्रकरणात एक महिला मॉर्निंग वॉकसाठी जात असताना, रेनकोट घातलेल्या आणि हेल्मेट परिधान केलेल्या अज्ञात स्कूटरस्वाराने तिचे सुमारे १ लाख ३९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढला.

मायना – कुडतरी पोलिसांनी या प्रकरणी बीएनएस कलम ३०४(२) अंतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. पोलिस निरीक्षक गौरव नाईक यांच्या नेतृत्वाखाली पथकाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४० वर्षीय वैष्णवी मणेरीकर यांच्यावर हा प्रसंग ओढवला. सकाळी साडेआठच्या सुमारास, दवर्ली येथील श्रीपाद श्रीवल्लभ मंदिराजवळून त्या नियमितपणे चालत असताना, काळ्या रंगाच्या स्कूटरवरून आलेल्या अज्ञात युवकाने मागून येत त्यांचे मंगळसूत्र हिसकावले. परिसर एकांत होता आणि घटनास्थळी तत्काळ मदतीसाठी कोणीच नव्हते.

अलीकडेच अशा चेन स्नॅचिंग प्रकरणांत काही आरोपींना अटक करण्यात आली होती, त्यामुळे या प्रकाराला काही प्रमाणात आळा बसला होता. मात्र, पुन्हा एकदा या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नागरिकांनी या वाढत्या घटनांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. स्थानिक रहिवासी सुरेश नाईक यांनी सांगितले की, या परिसरात एक चेन स्नॅचिंग टोळी सक्रीय आहे. विशेषतः सकाळच्या वेळी, जेव्हा वृद्ध किंवा महिला मॉर्निंग वॉकसाठी किंवा प्रार्थनेसाठी बाहेर पडतात, तेव्हा अशा घटनांचा धोका वाढतो. त्यांनी हेही नमूद केले की, दवर्ली मधील काही भागांत स्ट्रीट लाईट काम करत नसल्याने संधीसाधूंना बळ मिळते.

याआधीही अशाच प्रकारच्या काही घटना नोंदवल्या गेल्या आहेत. लवेदेभाट येथे इनासिना फ्रान्सिस्को फर्नांडिस यांच्याकडून दोन अज्ञातांनी ९० हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी हिसकावली. दवर्लीमध्ये या आधी, ६३ वर्षीय महिलेच्या घराबाहेर गप्पा मारण्याच्या बहाण्याने तिचे १ लाख ९० हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावले गेले. आके – मडगाव रस्त्यावर, एक दुचाकीस्वार महिला चालत असताना तिचे मंगळसूत्र आणि एक लाख रुपयांचे दागिनेघेऊन पसार झाला.

या सर्व प्रकरणांमध्ये आरोपींच्या कार्यपद्धतीत साम्य आढळत असल्याने, पोलिस विविध घटनांमधील दुवे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. पोलिसांनी अनेक संशयितांची चौकशी सुरू केली असून, तपास गतीने सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.पोलिसांकडून नागरिकांना अपील करण्यात आले आहे की, त्यांनी एकांत रस्त्यांवर फिरताना सावधगिरी बाळगावी, आणि कोणत्याही संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांना कळवावे. दरम्यान, परिसरात गस्त वाढवण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

---


**MBBS**



Ministry Of Health Of Russia

**SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA**

**Invites Indian students for direct Government Admissions**
**Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB**
**Satisfies all requirements of NMC of India**

**UNIVERSITY** – 105 years old Medical University. The University is situated in the center of the Smolensk city. Smolensk is situated 380 km west of Moscow. Very high standards of education, strict disciplinary system. **2170** Indian students (**960** Girls) studying, **244** got degree in **2025.** Duration 6 years including internship and License. English Medium in all years, Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).

**MCI SCREENING TEST** – Our graduates of **2008** to **2024** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and NBC conducting Screening Test confirm this). Dr. Aadi Morakhia, our graduate of 2023, has topped Screening Test 2023.

**SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA)** 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls. **INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.

**Fee** (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 5,10,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.

**Scholarship to all Indian students.**

Bank loans are available from Indian banks.

Contact: **DR. ALOK AERON +7 9605805555 (Russia)**

**Official web site: www.sgmu.info**

**Instagram: @sgmu.info**

**Admission details: admission.sgmu.live**

**INFORMATION CENTERS: (These are parents of our students)**

**Margao:** Mr. Desai – 9850466525, **Ponda:** Mr. Chodankar – 8010274925

**Mapusa:** Mr. Kauthankar – 9823674160

**Curchorem:** Mrs. Naik – 9130630410, **Cuncolim:** Mr. Dessai – 9850785115